
# चैतन्य साधना

जीवन विद्या मिशन



## सहनशक्तीला मर्यादा आवश्यक

'सहनशक्ती' मध्ये शक्ती हा शब्द आहे. शक्ती दोन प्रकारे काम करते.चांगलं पण करते आणि वाईट देखील करते. ज्याप्रमाणे वीज ही शक्ती काम करते. अति सहनशक्ती असेल तर ती तुम्हाला त्रासदायक ठरेल. त्यासाठी जीवनविद्येनं 'थांबायचं कुठे' हे देखील सांगितलं आहे.सहनशक्ती किती असावी,तर त्यासाठी काही मर्यादा हवीच. कुठे सहन केलं पाहिजे आणि कुठे सहन करू नये हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. उदारणार्थ एखाद्या स्त्रीची अवहेलना होतं असेल आणि तुम्ही सहन करत बसलात,का तर माझी सहनशक्ती खूप आहे तर ते योग्य नाही, याला सहनशक्ती म्हणत नाहीत. तिथे तुम्ही प्रतिकार केलाच पाहिजे. थोडक्यात काय तर सहन कुठे करायचं? आणि काय सहन करायचं हे योग्य रीतीने समजणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. परंतु ही एक शक्ती आहे आणि या शक्तीचा उपयोग करुन आपण आपल्या आयुष्यात बदल करू शकतो. ही शक्तीच तुम्हाला सुख, शांती,समाधान देणार आहे.



प्रल्हाद वामनराव पै
B.Tech(IIT), DMS,M~M, TQM (Japan)
आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

याबाबतीत एक मुद्दा अधिक स्पष्ट करावासा वाटतो तो म्हणजे, सहनशक्ती अशी असू नये की,सहन करत आहे आणि आतून कुढते आहे. काही लोकांच्या बाबतीत काय होतं, सहन करतात आणि आतून कुढत, रडत असतात. याला सहनशक्ती म्हणता येणार नाही.सहनशक्ती म्हणजे सहन करून सोडून दिलं पाहिजे. म्हणजे आपण मोकळे होतो. सहनशक्ती आपल्याला कुठे लागते? कुटूंबामध्ये, नोकरी अथवा व्यवसायाच्या ठिकाणी,समाजामध्ये सर्व ठिकाणी पाहिजे.कारण तुम्ही असं म्हणाल की मला सर्वगुणसंपन्न माणूस पाहिजे,तर तुमचा शोध कधीच संपणार नाही, तुम्ही मात्र एकटे पडाल. कारण प्रत्येकाकडे गुणदोष असतात, अगदी आपल्याकडे देखील दोन्हीही असतातच ना? मग ते दोष सहन करून गुणांचे कौतुक करत आपले संबंध चांगले करणं, आपली नाती सांभाळणं गरजेचे असते. म्हणून सहनशक्ती खूप महत्त्वाची आहे.

सहनशक्ती वाढण्यासाठी आपल्याला ठरवून प्रयत्न करावे लागतात. कसे ते सांगतो, दररोज अर्धातास ठरवायचा, या वेळात मी कोणत्याही गोष्टीकरिता चिडणार नाही. प्रथम अर्ध्या तासाने सुरुवात करायची,हळूहळू अर्ध्या तासाचा एक तास करायचा,पुढे दोन चार तास असं ठरवून करायचं, आता मी चिडणार नाही. नंतर तुम्हाला न चिडण्याची सवय होईल. आणि म्हणूनच सामंजस्य झाला खूप महत्व आहे. समजून घेण्याची तयारी नसेल तर तुमची सहनशक्ती कधीच वाढणार नाही. सामंजस्य आणि सहिष्णुता यांचा संबंध आहे.सामंजस्य वाढलं की सहिष्णुता वाढते.

क्रमशः

(उद्याच्या अंकात वाचा : ब्रह्माकुमारीज्)

# राज्यात स्विस चॅलेंज पद्धत राबवणार

## पायाभूत सुविधा क्षेत्रातील कामे वेगाने होण्यासाठी प्रयत्न

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - राज्यात पायाभूत सुविधा क्षेत्रात विविध प्रकल्पांची कामे गतीने होण्यासह नाविन्यपूर्ण कामांचे प्रस्ताव शासनाकडे सादर व्हावेत यासाठी स्विस चॅलेंज पद्धतीने कामे हाती घेण्याविषयीच्या धोरणास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे कृषी, सार्वजनिक परिवहन आणि नागरी सुविधा क्षेत्रातील सार्वजनिक हिताचे विविध प्रकल्प उभारण्यास मदत होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्विस चॅलेंज पद्धती ही एक नव्याने उदयास आलेली निविदा प्रक्रिया आहे. या पद्धतीमध्ये खाजगी व्यक्ती किंवा संस्था स्वत:हून (डीं चौं) सार्वजनिक हितासाठी आवश्यक असलेली नाविन्यपूर्ण कामे निवडतात आणि अशा कामाची अंमलबजावणी करण्याबाबत स्वत: पुढाकार घेऊन शासनास प्रस्ताव सादर करतात. त्यानंतर शासनाकडून त्या कामासाठी निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येऊन अन्य पात्र कंत्राटदारांकडून स्पर्धात्मक पद्धतीने निविदा मागविण्यात येतात. या प्रक्रियेत



निविदेत सहभागी झालेल्या अन्य उद्योजकांकडून जर मूळ सूचकाच्या प्रस्तावापेक्षा अधिक नाविन्यपूर्ण आणि किफायतशीर प्रस्ताव शासनास सादर झाल्यास मूळ सूचकास स्पर्धात्मक निविदेमधून प्राप्त प्रस्तावानुसार त्याचा प्रस्ताव मॅच (मिळताजुळता) करण्याची संधी देण्यात येते.

स्विस चॅलेंज पद्धती ही अनेक देशात व्यापक प्रमाणात वापरण्यात येते. भारतातदेखील केंद्र शासनाबरोबरच काही राज्यांनी स्विस चॅलेंज पद्धतीमध्ये आवश्यक सुधारणा करून तिचा अवलंब केला आहे. देशात सध्या आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश व राजस्थान आदी राज्यांमध्ये काही वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी या पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. राज्यात या पद्धतीअंतर्गत कृषी क्षेत्रातील किमान २५ कोटी, परिवहन क्षेत्रातील किमान २०० कोटी आणि नागरी क्षेत्रातील किमान ५० कोटी रूपये किमतींचे पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत.

स्पर्धात्मक पद्धतीने निविदा प्राप्त झाल्यानंतर मूळ सूचकाने सादर केलेला प्रस्ताव हा अन्य उद्योजकाच्या कमी दराच्या किंवा किफायतशीर प्रस्तावाच्या अंतिम निविदा किंमतीच्या कमाल १० टक्क्यांपर्यंत अधिक असेल तरच मूळ सूचकास कमी दराच्या अथवा किफायतशीर प्रस्तावास मॅच करण्याची संधी देण्यात येणार आहे. मूळ सूचक यांनी मूळ प्रस्ताव अन्य उद्योजकाप्रमाणे करून दिल्यास त्यांना प्रकल्प सुरू करण्याची परवानगी दिली जाईल. अन्यथा हा प्रकल्प राबविण्याची परवानगी न्यूनतम दराची निविदा सादर करणाऱ्या संस्थेस देण्यात येईल.

स्विस चॅलेंज पद्धतीने यशस्वीरित्या राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या सूचकास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आलेल्या खर्चाची (स्विकृत प्रकल्प किंमतीच्या कमाल ०.१ टक्क्यांपर्यंत) भरपाई देण्यात येणार आहे. ही भरपाई प्रकल्प सुरू करण्यास परवानगी दिलेल्या उद्योजकाकडून मिळालेल्या रकमेतून करण्यात येईल.

या पद्धती अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पांची संबंधित प्रशासकीय विभागाकडून छाननी झाल्यानंतर विविध टप्प्यांवरील मान्यता देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात येणार आहे. कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार शासनास राहणार आहे.

# उमेश काशीकर यांना पितृशोक

**प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार- राज्याचे राज्यपाल चे. विद्यासागर राव यांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांचे वडिल रामचंद्र काशीकर यांचे काल रात्री नागपूर येथे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.

ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street,
Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

टाटा स्टील लिमिटेडच्या (''कंपनी'') संचालक मंडळाची सभा दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाकरिताच्या लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांना इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी सोमवार, ३० ऑक्टोबर, २०१७ रोजीस आयोजित करण्यात आली आहे.

वित्तीय निष्कर्ष हे कंपनीचे संकेतस्थळ www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे संकेतस्थळ www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ www.bseindia.com यावर उपलब्ध असणार आहे.

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**श्रीम. अनिता कल्याणी**
अंतरिम कंपनी सचिव

२४ ऑक्टोबर, २०१७
मुंबई

TATA STEEL

# देशी दारुनंतर आता बिअर महागली

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - राज्य सरकारने बिअरच्या उत्पादन शुल्कात २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत वाढ केल्याने बिअरचे दर वाढले आहेत.बिअरच्या वाढीव उत्पादन शुल्कातून सरकारला दीडशे कोटी रूपयांचा महसूल अपेक्षित आहे.

उत्पादन शुल्क वाढल्याने माईल्ड आणि स्ट्राँग पिंट बिअरचे दर तीन ते साडेचार रूपयाने वाढले आहेत. तर ६५० मिलीलीटरच्या माईल्ड आणि स्ट्राँग बिअरचे दर पाच ते साडेसहा रूपयांनी वधारले आहेत. बिअरच्या निर्मिती खर्चावर आधारीत उत्पादन शुल्काचे दर वाढवण्यात आले आहेत.

किंगफिशर, कार्सबर्ग, बडवायजर या ब्रण्डच्या पिंट बिअर किंमत ६० ते ११० रूपयांच्या दरम्यान आहे. तर ६५० मिलीलीटरच्या बाटलीसाठी ११० ते २३० रूपये मोजावे लागतात. बार आणि हाटेलप्रमाणे बिअरचे दर बदलतात. बिअरच्या उत्पादन शुल्काचे दर वाढल्याने सरकारला अतिरिक्त १५० कोटी रूपयांचा महसूल मिळण्याची शक्यता आहे.

(This is only an advertisement for information purpose and not a Prospectus announcement. This does not constitute an invitation or offer to acquire, purchase or subscribe to securities. Not for publication or distribution, directly or indirectly outside India.)

**SecUR Credentials Limited**

**Corporate Identification Number: U74110MH2001PLC133050**

*Our Company was originally incorporated as a private limited company under the Companies Act, 1956 pursuant to a certificate of incorporation issued by the Registrar of Companies, Maharashtra, Mumbai dated August 14, 2001 with the name 'Axis Resources Private Limited'. Subsequently the name of our Company was changed to 'SecUR Credentials Private Limited' and a fresh certificate of incorporation consequent upon change of name was issued by the Registrar of Companies, Maharashtra, Mumbai on July 18, 2016. Subsequently, our Company was converted into a public limited company pursuant to approval of the shareholders at an extraordinary general meeting held on July 19, 2017 and consequently, the name of our Company was changed to 'SecUR Credentials Limited' and a fresh certificate of incorporation consequent upon conversion to public limited company was issued by the Registrar of Companies, Maharashtra, Mumbai on July 27, 2017. For further details of our Company, please refer "General Information" and "History and Certain Other Corporate Matters' on pages 43 and 93, respectively of the Prospectus.*

**Registered Office:** A-303, Classique Centre, Off Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai – 400 093, Maharashtra, India.
**Tel:** +91 22 6173 7788 | **Fax:** +91 22 4027 7878 | **Website:** www.secur.co.in | **E-mail:** complianceofficer@secur.co.in
**Corporate Office:** Unit nos. 39, 46 and 47, Nandghanshyam Industrial Estate, Off. Mahakali Caves Road, Andheri East, Mumbai - 400 093, Maharashtra, India.
**Contact Person:** Nitin Shetty, Company Secretary and Compliance Officer

**PROMOTER OF THE COMPANY: PANKAJ VYAS**

**THE ISSUE**

**PUBLIC ISSUE OF 14,67,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10.00 EACH OF SECUR CREDENTIALS LIMITED ("OUR COMPANY" OR "THE ISSUER") FOR CASH AT A PRICE OF ₹ 205.00 PER EQUITY SHARE (INCLUDING A SHARE PREMIUM OF ₹ 195.00 PER EQUITY SHARE) ("ISSUE PRICE") AGGREGATING TO ₹ 3,007.35 LAKHS ("THE ISSUE"). OF THE ISSUE, 75,000 EQUITY SHARES AGGREGATING TO ₹ 153.75 LAKHS WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY MARKET MAKER ("MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE ISSUE LESS THE MARKET MAKER RESERVATION PORTION I.E. ISSUE OF 13,92,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10.00 EACH AT AN ISSUE PRICE OF ₹ 205.00 PER EQUITY SHARE AGGREGATING TO ₹ 2,853.60 LAKHS IS HEREINAFTER REFERRED TO AS THE "NET ISSUE". THE ISSUE AND THE NET ISSUE WILL CONSTITUTE 30.01% AND 28.48%, RESPECTIVELY OF THE POST ISSUE PAID UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY. FOR FURTHER DETAILS, PLEASE REFER "TERMS OF THE ISSUE" ON PAGE 173 OF THE PROSPECTUS.**

**THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES IS ₹ 10.00 EACH AND THE ISSUE PRICE OF ₹ 205.00 IS 20.50 TIMES OF THE FACE VALUE**

**THE APPLICATION MUST BE FOR A MINIMUM OF 600 EQUITY SHARES AND IN MULTIPLES OF 600 EQUITY SHARES THEREAFTER.**

**THIS ISSUE IS BEING MADE IN TERMS OF CHAPTER XB OF THE SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (ISSUE OF CAPITAL AND DISCLOSURE REQUIREMENTS) REGULATIONS, 2009 ("SEBI (ICDR) REGULATIONS"), AS AMENDED FROM TIME TO TIME. ALL INVESTORS SHALL PARTICIPATE IN THIS ISSUE THROUGH ASBA PROCESS ONLY. FOR FURTHER DETAILS, PLEASE REFER "ISSUE PROCEDURE" ON PAGE 178 OF THE PROSPECTUS.**

**ISSUE** **OPENS ON: WEDNESDAY, NOVEMBER 1, 2017**
**CLOSES ON: FRIDAY, NOVEMBER 3, 2017**

| | | | |
|---|---|---|---|
| ASBA* | Simple, Safe, Smart way of Application- Make use of it !!! | * Application Supported by Blocked Amount (ASBA) is a better way of applying to issues by simply blocking the fund in the bank account, investors can avail the same. For details, check section on ASBA below. | Mandatory in Public Issues from January 01, 2016 No cheques will be accepted. |

**LISTING:** The Equity Shares offered through the Prospectus are proposed to be listed on the SME Platform of National Stock Exchange of India Limited (NSE EMERGE) in terms of the Chapter XB of the SEBI (ICDR) Regulations, as amended from time to time. Our Company has received an in-principle approval letter dated October 13, 2017 from National Stock Exchange of India Limited (NSE) for using its name in the offer document for listing of our Equity Shares on NSE EMERGE. For the purpose of this Issue, the Designated Stock Exchange will be NSE.

**DISCLAIMER CLAUSE OF SEBI:** Since the Issue is being made in terms of Chapter XB of the SEBI (ICDR) Regulations, 2009, the Draft Offer Document was not filed with SEBI. In terms of the SEBI (ICDR) Regulations, SEBI shall not Issue any observation on the Offer Document. Hence, there is no such specific disclaimer clause of SEBI. However, investors may refer to the entire **"Disclaimer Clause of SEBI"** beginning on page 158 of the Prospectus.

**DISCLAIMER CLAUSE OF NSE (DESIGNATED STOCK EXCHANGE):** It is to be distinctly understood that the permission given by NSE should not in any way be deemed or construed that the Offer Document has been cleared or approved by NSE nor does it certify the correctness or completeness of any of the contents of the Offer Document. The investors are advised to refer to page 161 of the Offer Document for the full text of the **"Disclaimer Clause of National Stock Exchange of India Limited"**.

**IPO GRADING:** Since the Issue is being made in terms of Chapter XB of the SEBI (ICDR) Regulations, there is no requirement of appointing an IPO Grading agency.

**GENERAL RISKS:** Investments in equity and equity-related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in the Issue unless they can afford to take the risk of losing their entire investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in the Issue. For taking an investment decision, investors must rely on their own examination of our Company and the Issue, including the risks involved. The Equity Shares offered in the Issue have not been recommended or approved by the SEBI, nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the contents of the Prospectus. Specific attention of investors is invited to see the section titled "Risk Factors" beginning on page 15 of the Prospectus.

**ADDITIONAL INFORMATION AS REQUIRED UNDER SECTION 30 OF THE COMPANIES ACT, 2013**

**CONTENTS OF THE MEMORANDUM OF ASSOCIATION OF OUR COMPANY AS REGARDS ITS OBJECTS:** For information on the main objects and other objects of our Company, refer section *"History and Certain Corporate Matters"* beginning on page 93 of the Prospectus and Clause III of the Memorandum of Association of our Company. The Memorandum of Association of our Company is a material document for inspection in relation to the Issue. For further details, refer section *"Material Contracts and Documents for Inspection"* beginning on page 268 of the Prospectus.

**AMOUNT OF SHARE CAPITAL OF THE COMPANY AND CAPITAL STRUCTURE:** Authorised Share Capital: ₹ 600.00 Lakhs, divided into 60,00,000 Equity Shares of ₹ 10 each. Issued, Subscribed & Paid-up Share Capital prior to the Issue: ₹ 342.14 Lakhs divided into 34,21,425 Equity Shares of ₹ 10 each. Proposed Post Issue Paid-up Share Capital: ₹ 488.84 Lakhs divided into 48,88,425 Equity Shares of ₹ 10 each. For details of share capital and capital structure of our Company, refer section 'Capital Structure' beginning on page 50 of the Prospectus.

**LIABILITY OF MEMBERS:** The Liability of the members of the Company is limited.

**SIGNATORIES TO MOA AND SHARES SUBSCRIBED:**
**Original Signatories:** Ashutosh Navalkar (5,000 Equity Shares) and Hitesh Asrani (5,000 Equity Shares) aggregating to 10,000 Equity Shares.
**Current Promoter:** Pankaj Vyas (25,32,380 Equity Shares).

| LEAD MANAGER TO THE ISSUE | REGISTRAR TO THE ISSUE | COMPANY SECRETARY AND COMPLIANCE OFFICER |
|---|---|---|
| INVENTURE MERCHANT BANKER SERVICES PVT. LTD. Enhancing Fortunes. Enriching Lives. **INVENTURE MERCHANT BANKER SERVICES PRIVATE LIMITED** 2nd Floor, Viraj Tower, Nr. Andheri Flyover (North End) Western Express Highway, Andheri (East) Mumbai – 400 069. **Tel:** +91 22 3954 8500; **Fax:** +91 22 3954 8511 **Website:** www.inventuregrowth.com **Email:** sme.ipo@inventuremerchantbanker.com **Investor Grievance Email:** redressal@inventuremerchantbanker.com **SEBI Registration No.:** INM000012003 **Contact Person:** Arvind Gala | TOWARDS EXCELLENCE **SKYLINE FINANCIAL SERVICES PRIVATE LIMITED** 4A9, Gundecha Onclave, Kherani Road, Sakinaka, Mumbai - 400 072. **Tel:** +91 22 2851 1022 / 6221 5779 **Website:** www.skylinerta.com **Email:** Mumbai@skylinerta.com **Investor Grievance Email:** grievances@skylinerta.com **SEBI Registration No.:** INR000003241 **Contact Person:** Subhash Dhingreja | **NITIN SHETTY** **SECUR CREDENTIALS LIMITED** A 303, Classique Centre, Off Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai – 400 093, Maharashtra, India. **Tel:** +91 22 6173 7788; **Fax:** +91 22 4027 7878 **E-mail:** complianceofficer@secur.co.in **Applicants can contact the Compliance Officer or the Lead Manager or the Registrar to the Issue in case of any pre-Issue or post-Issue related problems, such as non-receipt of letters of Allotment, credit of Allotted Equity Shares in the respective beneficiary account and refund orders, etc. All complaints, queries or comments received by Stock Exchange / SEBI shall be forwarded to the Lead Manager, who shall respond to the same.** |

**AVAILABILITY OF PROSPECTUS:** Investors should note that Investment in Equity Shares involves a degree of risk and investors are advised to refer to the Prospectus and the Risk Factors contained therein, before applying in the Issue. Full copy of the Prospectus shall be available at the website of SEBI at www.sebi.gov.in; the website of Stock Exchange at www.nseindia.com, the website of Lead Manager at www.inventuremerchantbanker.com and the website of the Issuer Company at www.secur.co.in.

**AVAILABILITY OF APPLICATION FORMS:** Application forms can be obtained from the Stock Exchange, Issuer Company: SecUR Credentials Limited, Lead Manager: Inventure Merchant Banker Services Private Limited, Banker to the Issue, Stock Brokers, Registrar to Issue and Share Transfer Agents, Depository Participants and the list of SCSBs available on the website of SEBI at www.sebi.gov.in. Application Forms can also be downloaded from the website Stock Exchange at www.nseindia.com

**APPLICATIONS SUPPORTED BY BLOCKED AMOUNT (ASBA):** Investors shall apply through the ASBA process. The investors are required to fill the ASBA form and submit the same to their banks. The SCSB will block the amount in the account as per the authority contained in ASBA form. On allotment, amount will be unblocked and account will be debited only to the extent required to be paid for allotment of shares. Hence, there will be no need of refund.

For more details on the ASBA process, refer to the details given in application forms and Abridged Prospectus and also refer section *"Issue Procedure"* beginning on page 178 of the Prospectus

**BANKER TO THE ISSUE:** ICICI Bank Limited

All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the Prospectus dated October 16, 2017.

For **SecUR Credentials Limited**
On behalf of the Board of Directors
Sd/-
**Managing Director**

**Place :** Mumbai
**Date :** October 25, 2017

**SecUR Credentials Limited** is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offer of its Equity Shares and has filed the Prospectus with the Registrar of Companies, Mumbai. The Prospectus shall be available on the website of SEBI at www.sebi.gov.in, the website of the Lead Manager at www.inventuremerchantbanker.com, the website of the NSE i.e. www.nseindia.com, and website of the Issuer Company at www.secur.co.in. Investors should note that investment in Equity Shares involves a high degree of risk. For details investors should refer to and rely on the Prospectus including the section "Risk Factors" beginning on page 15 of the Prospectus, which has been filed with the Registrar of Companies, Mumbai.

The Equity Shares have not been and will not be registered under the US Securities Act (the "Securities Act") or any state securities law in United States and may not be Issued or sold within the United States or to, or for the account or benefit of, "U.S. persons" (as defined in the Regulations under the Securities Act), except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to the registration requirements of the Securities Act of 1933.

Raka

# विमानात विनयभंग करणाऱ्या प्रवाशाला अटक

**प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - विमान प्रवासात दारुच्या नशेत एका महिलेशी अश्लील वर्तन करुन तिचा विनयभंग करणाऱ्या सचिनकुमार देवेंद्रसिंग पांचाळ या प्रवाशाला एअरपोर्ट पोलिसांनी अटक केली. एक दिवसाच्या पोलीस कोठडीनंतर त्याची येथील स्थानिक न्यायालयाने जामिनावर सुटका केली. ही महिला एका खाजगी विमान कंपनीत कामाला आहे. दोन दिवसांपूर्वी ती दिल्लीहून मुंबईत येत होती. याच विमानात सचिनकुमार पांचाळ हा प्रवासी होता. दारुच्या नशेत तो या महिलेकडे गेला आणि त्याने तिच्याशी अश्लील वर्तन केले. त्यानंतर त्याने तिचा विनयभंग केला होता. हा प्रकार तिच्याकडून तिच्या सहकाऱ्यांना समजताच त्यांनी त्याला ताब्यात घेतले होते. सांताक्रुज विमानतळ येताच त्याला या कर्मचाऱ्यांनी एअरपोर्ट पोलिसांच्या ताब्यात दिले. या महिलेच्या तक्रारीवरुन पोलिसांनी त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदविला होता. गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी अटक केली.

**चेंबूर येथे महिलेवर चाकूने हल्ला**

चेंबूर येथे एका महिलेवर चाकूने हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आरोपी शिवाजी कांबळे याला नेहरुनगर पोलिसांनी अटक केली. बलात्काराची तक्रार मागे घेण्यासाठी त्याने या महिलेवर दबाव आणला होता. ती ऐकत नसल्याने त्याने रागाच्या भरात तिच्यावर हल्ला केल्याचे उघडकीस आले आहे.

चेंबूर येथील वत्सलाताई नाईक नगरात ही महिला राहते. तिच्या मुलीवर शिवाजीच्या मुलाने बलात्कार केला होता. याप्रकरणी गुन्हा नोंद होताच आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली होती. हा गुन्हा मागे घेण्यासाठी शिवाजी हा पीडित मुलीच्या आईवर दबाव आणत होता. मात्र तिने तक्रार मागे घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे त्याने काल तिच्यावर चाकूने वार केले होते. गळ्यावर गंभीर दुखापत झाल्याने ही महिला जागीच कोसळली होती. या घटनेची माहिती मिळताच नेहरुनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन या महिलेस जवळच्या शीव रुग्णालयात दाखल केले होते. तिथे तिच्यावर उपचार सुरु असून तिची प्रकृती आता स्थिर आहे. या महिलेच्या पतीच्या तक्रारीवरुन नेहरुनगर पोलिसांनी शिवाजी कांबळेविरुद्ध हत्येचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदविला होता. गुन्हा दाखल होताच पळून गेलेल्या शिवाजी कांबळे याला पोलिसांनी अटक केली. सध्या तो पोलीस कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.



## क्राईम डायरी



**घरफोडीच्या दोन घटनेत १३ लाखांची लूट**

घरफोडीच्या दोन घटनेत अज्ञात चोरट्यांनी तेरा लाख रुपयांचा ऐवज पळवल्याचे उघड झाले. या दोन्ही घटना काळबादेवी आणि मुलुंड परिसरात घडल्या असून एल. टी. मार्ग आणि मुलुंड पोलिसांनी दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद केली आहे. दर्शन किंतू शहा हा तरुण फणसवाडीतील एका निवासी इमारतीत राहतो. काळबादेवी वाहतूक चौकीजवळ त्याचे एक दुकान आहे. या दुकानात काही अज्ञात चोरट्यांनी खिडकीचे ग्रील तोडून सुमारे साडेनऊ लाख रुपयांचा ऐवज चोरी केला होता. त्यात सोन्याचे दागिने आणि अडीच लाख रुपयांच्या रोख रक्कमेचा समावेश होता. काल दुपारी हा प्रकार उघडकीस येताच त्याने पोलिसांना ही माहिती दिली होती. मुलुंड येथील दुसऱ्या घटनेत चोरट्यांनी साडेतीन लाख रुपयांचे विविध कंपनीचे इलेक्ट्रीक वायर बंडलची चोरी केली. मुलुंडच्या निर्मल लाईफलाईन स्टाईलमध्ये एका इलेक्ट्रीक कंपनीत तक्रारदार कामाला आहे. तिथेच त्याचे एक दुकान आहे. या गोदामात प्रवेश करुन ही चोरी झाली होती. हा प्रकार काल सकाळी उघडकीस येताच त्यांनी मुलुंड पोलिसांना ही माहिती दिली होती. या घटनेनंतर पोलिसांनी दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद करुन आरोपींचा शोध सुरु केला आहे.


# स्वागत दिवाळी अंकांचे !

## अनीता




दरवर्षी विविध विषयांना वाहिलेला 'अनीता' हा दिवाळी अंक यंदाही खुमासदार झालेला आहे. 'बाबांच्या शतकोत्सवी सोहळ्याची सुरुवात' हा अरविंद भानुशाली यांचा लेख विशेष माहिती देणारा आहे. तसेच 'पत्रकारांचे पालक' हा बाळासाहेब विखे-पाटील यांच्यावर ज्येष्ठ पत्रकार सुकृत खांडेकर यांनी अत्यंत वाचनीय लेख लिहिलेला आहे. 'आनंद दिघेंचा वारसा एकनाथ शिंदेंनी चालविला !', 'फडणवीस सरकारची तीन वर्षे', 'शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे राजकारण', 'सोशल मीडियाचे फायदे-तोटे' आदी लेख वाचनीय व अभ्यासपूर्ण आहेत. 'भीतीदायक खैबरखिंड'हा अरुणा बुरसुंगे यांचा लेख पाकिस्तानची सैर घडवतो. अवधूत दप्तरी यांचा 'शिक्षणाचा खेळखंडोबा' हा लेख अभ्यासपूरक आहे. 'प. पू. योगतज्ज्ञ दादाजी वैशंपायन, नियतीचा भाष्यकार' हा श्री. वा. नेर्लेकर यांचा लेख उत्तम असून त्यात त्यांनी दादाजी वैशंपायन यांची साधना, त्यांचे भविष्य आदींची माहिती दिली. 'मराठी चित्रपट कधी फुले, कधी चक्र काटे' हा ज्येष्ठ चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर यांचा लेख वास्तवाचे दर्शन घडवतो. 'मराठी नाटकांची दिशा व दशा' हा शरद विचारे यांचा लेख ही नाट्यरसिकांना मेजवानी देणारा आहे.

**अनीता**
संपादक-
वैशाली संतोष भानुशाली





मूल्य- १०० रुपये

## सामना

'सामना' चा दिवाळी अंक उत्तम लेखांनी नटलेला आहे. 'मी, अपर्णा कर्नल पुरोहित' हा लेख अंगावर अत्यंत काटा आणणारा आहे. मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी कर्नल प्रसाद पुरोहित यांच्या पत्नी अपर्णा पुरोहित यांनी पती आठ वर्षे तुरुंगात असताना केलेला खडतर संघर्ष त्यात रेखाटला आहे. कर्नल पुरोहित यांचा कसा छळ करण्यात आला , याची पूर्ण माहिती यात अपर्णा यांनी दिली आहे. 'भविष्यातील आयुष्य' हा विशेष लेख आहे. भविष्यात संगणक कसे असतील. शाळा कशी असेल, १० वी असेल की बारावी, मानवाचा डीएएन हवा तसा वाकवला जाईल आदींची माहिती या लेखात देण्यात आली आहे.

'इथे अवयव बनून मिळतील' या डॉ. अविनाश भोंडवे यांच्या लेखात भविष्यात आपल्या शरीरातील एखादा भाग खराब झाला तर तो बदलून मिळेल. अमरत्वाच्या शोधात असलेल्या मानवाला दृष्टीने तो अत्यंत महत्वाचा टप्पा असेल. 'मराठीची महानदी' या लेखात डॉ. गणेश देवी यांनी सांगितले की, मराठी ही जगातील शक्तीमान भाषा आहे. पण ज्ञानाची भाषा म्हणून मराठीचे स्थान टिकवण्यासाठी आपल्या भाषेत ज्ञाननिर्मितीचे प्रयत्न वाढायला हवेत.

**सामना**
संपादक- उद्धव ठाकरे
मूल्य-१०० रुपये




## आरोग्य ज्ञानेश्वरी

आरोग्य ज्ञानेश्वरी या अंकात आहारविषयक मौलिक मार्गदर्शन करण्यात आले आहे. यात मुलांसाठी नाश्त्याचे वेळापत्रक देण्यात आले आहे. जादा वजन व लठ्ठपणा टाळण्यासाठी काय करता येईल याच्या टीप्स अंकात देण्यात आल्या आहेत. आहारात मीठाचा अंतर्भाव कमी करा, भरपूर पाणी प्या, आहारात हिरव्या भाज्या, कोशिंबीर, चटणी फळे यांचा भरपूर समावेश करा, अन्नपचनासाठी जेवणानंतर विड्याचे पान खा, पानासोबत चुना खाल्ल्यास कॅल्शियम मिळून हाडे बळकट होतात, दात कमी कीडतात याविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**आरोग्य ज्ञानेश्वरी**
संपादक - डॉ. राजेंद्र आगरकर, डॉ. हेमंत जोशी, डॉ. अर्चना जोशी, मूल्य - २०० रुपये